# देखणे ते चेहरे

- बा.भ.बोरकर

गेल्या शतकातले सुप्रसिध्द सौंदर्यवादी, आशावादी, रसमधुर भावकवि म्हणजे बा.भ.बोरकर. गोव्यासारख्या निसर्ग-लावण्याने नटलेल्या हिरव्या भूमित बोरकरांचा जन्म झाला, ते तिथेच वाढले. तिथेच त्यांची प्रतिभा फुलारली. म्हणूनच ''सौंदर्यपूर्णता'' हे लेणे त्यांच्या कवितेवर सहज चढवले जाते आणि मग ती कविता भरजरी शेला अंगावर ओढलेल्या ललनेसारखी लावण्यसंपन्न होऊन जाते. त्यांच्या कवितेतील सौंदर्यविशेषाचे हे विलोभनीय रहस्य त्यांच्या सौंदर्यमूजक वृत्तीत आणि गोव्याच्या रसरूपगंधाने बहरलेल्या निसर्गात आहे.

याच कवितेत पहा, देखणेपणा कुणाला आवडत नाही? सुर्याचा उदयास्त देखणा असतो, वनश्री, पाऊस, नक्षत्रांनी लखलखणारे आभाळ, रंगगंध उधळणारी फुले, सारंच देखणं आहे. हा निसर्ग जसा देखणा आहे, तसाच माणूसही देखणा आहे. एखादी असामान्य लावण्यवती किंवा मर्दानी सौंदर्याची देणगी लाभलेला पुरूष हेही देखणेच आहेत, हे सर्वसाधारण जनमत झाले. पण बोरकरांच्या बाबतीत मात्र इथे देखणेपणाची व्याख्याच बदलून जाते. बोरकर या कवितेत बाह्य सौंदर्याचा संबंध माणसाच्या गुणसंपदेशी कसा जोडलेला आहे हे याचे एक मनोहर चित्र रेखाटतात. याचा अर्थ त्यांना बाह्य सौंदर्याची जाण नाही, असा नसून त्यांच्यातील एक चिंतनशील गुणग्राहक माणसाच्या सौदर्याचा एक वेगळाच चिरंतन सोहळा आपल्यापुढे उभा करतो. या सोहळ्याचे एकेक कडव्यामधून आपण दर्शन घेऊ या......

देखणे ते चेहरे । जे प्रांजळाचे आरसे ॥
गोरटे की सावळे । या मोल नाही फारसे ॥१॥

प्रांजळपणाला लबाडी माहित नसते. ढोंगही ठाऊक नसते. जे जसे आहे, तेच त्या चेहऱ्यावर ओसंडू लागते. म्हणूनच तो निर्व्याज चेहरा बोरकरांना सुंदर वाटतो. तो सावळा की गोरा याला त्या निरागसपणापुढे मग फारसा अर्थ उरतच नाही.

तेच डोळे देखणे । जे कोंडिती साऱ्या नभा ॥
वोळिती दु:खे जनांच्या । जे मांडिती नेत्र प्रभा ॥२॥

दुसऱ्यांच्या दु:खाने भरून येणारे डोळे कविला देखणे दिसतात. ते त्याला आभाळाएवढे विशाल व प्रभा फाकणारे भासतात.अशा डोळ्यांना टपोरे, काळेभोर, कमळासारखे या बाह्य सौंदर्याची अजिबात गरज नाही, असे कविचे प्रांजळ मत इथे स्पष्ट होते.

देखणे ते ओठ कीजे । ओविती मुक्ताफळे ॥
आणि ज्यांच्या लाघवाने । सत्य होते कोवळे ॥३॥

नेहमी सत्य बोलणारे लोक कधीकधी नको इतके कठोर होतात. त्यांचे शब्द मनाला जखमा करतात. पण तेच सत्य जर मृदु, गोड, शब्दात सांगितले तर ते कोवळे म्हणजे हृदयाला न झोंबणारे होते. असे मृदुभाषी ओठ कविच्या दृष्टीने देखणे आहेत.

देखणे ते हात ज्यांना निर्मितीचे डोहळे ॥
मंगलाने गंधलेले । सुंदराचे सोहळे ॥४॥

सृष्टीलाच विधात्याने निर्मितीचे सुंदर वरदान दिलेले आहे. तेजाने तळपणारा रवी पावसाची निर्मिती करतो. पाऊस भूमीचे सृजन करतो. त्यातून वनस्पती, जीवसृष्टी जन्माला येते. जीवांमधली अत्त्युच्च निर्मिती म्हणजे मानव ! त्याच्या जीवनात तो विविधांगी निर्मितीचे रंग भरतो. शास्त्र, साहित्य, कला अशा क्षेत्रात स्वहस्ते तो मांगल्याची निर्मिती करतो. बोरकरांच्या भाषेत हे निर्मितीक्षम हात देखणे होऊन जातात. त्यांना मांगल्याचा सुवास असतो. हे हात सौंदर्याची जणू आरासच मांडतात.

देखणी ती पाउले । जी ध्यासपंथे चालती ॥
वाळवंटातून सुध्दा । स्वस्तिपद्मे रेखिती ॥५॥

ध्येयामागे धावणाऱ्या माणसाला अडचणींचे पहाडही रोखू शकत नाहीत. तापलेल्या वाळवंटातून त्याची चालण्याची तयारी असते. अशी ध्येयाचा ध्यास घेऊन धावणारी पावले उरलेल्या समाजाला पाऊलखुणा ठेवून जातात. त्या स्वस्ति (शुभ) कमळासारख्या देखण्या असल्यामुळे कविला ती पावलेही देखणी वाटतात.

देखणे ते स्कंध ज्यांचे । सूळ नेती स्वेच्छया ।
लाभला आदेश प्राणा । निश्चये पाळावया ॥६॥

एखादा देशभक्त क्रांतीकारक स्वत:चे मरण खांद्यावर घेऊनच वावरत असतो. त्याला प्रांणांचीही पर्वा नसते. असे निग्रही खांदे देखणे म्हंटले पाहिजेत, असे बोरकर म्हणतात. पराक्रम, शौर्य, जबाबदारीची जाणीव अशा गुणांनी युक्त असलेले खांदे; रुंद असोत वा नसोत तेच खरे देखणे होत.

देखणी ती जीवने । जी तृप्तिची तीर्थोदके ॥
चांदणे ज्यातून वाहे । शुभ्र पाऱ्यासारखे ॥७॥

ऐहिक जीवनाची माणसाची हाव कधीच संपत नाही. अन्न, वस्त्र, निवारा या माणसाच्या मूळ गरजा असल्या तरी तोच माणूस 'माझ्याकडे असलेल्या Carsच्या ताफ्यामधे मर्सिडीझ कार कधी येईल' यासाठी धडपडत असतो. माणूस बुध्दिजीवी प्राणी आहे, तेव्हा त्याने भौतिक प्रगतीची शिखरे जरूर गाठली पाहिजेत. परंतु हे त्याचे सर्व कर्तृत्व हावरटपणातून न होता, केवळ स्वार्थापोटी न होता; साऱ्या समाजाच्या विचारातून व्हावे; त्याला एक निर्मळ पारदर्शकता असावी आणि मुख्य म्हणजे ही उर फुटेपर्यंत होत असलेली धावाधाव त्यानेच योग्य क्षणी थांबवावी. जबरदस्तीने नव्हे तर, समाधानाने, तृप्तीने थांबल्यास भोवतीच्या समाजासाठी आपण होऊन तो सेवा देईल. तेव्हाच त्याचे जीवन पवित्र, शुद्ध व देखणे होईल.

देखणा देहान्त तो । जो सागरी सुर्यास्तसा ॥
अग्निचा पेरून जातो । रात्रगर्भी वारसा ॥८॥

जन्माला आलेला प्रत्येक जीव जगाचा निरोप घेत असतो. मग तो कोट्यावधी डॉलर्सचा मालक असो किंवा भणंग भिकारी ! परंतू सूर्य अस्ताला जातांना रात्रीच्या अंधारातही माणसांना जगण्याची हिंमत देतो, उद्याची आशा देतो; तसा आपला अस्त, मृत्यूही मागच्या लोकांना प्रेरणा, आदर्श देऊन जावा. तसे झाले तर तो देहान्तही देखणाच होईल. बाह्य देखणेपणा आपल्या हातात नाही, हे सत्य सर्वांनाच महित आहे. परंतु अंतरंगीचे सौंदर्य मात्र आपण प्रयत्नांनी प्राप्त करु शकतो, अशी भरभरून ग्वाही बोरकर आपल्याला देतात. या कवितेतून मानवी जीवनाच्या अर्थपूर्ण साफल्याची आपल्याला लाभलेली ही दिशा हीच बोरकरांची अमूल्य देणगी होय.

रमेश तेंडूलकरांनी बोरकरांच्या कवितेवर केलेल्या एका यथार्थ भाष्यावर येऊन थांबू या.

तेंडूलकर म्हणतात,

'' मनातल्या प्रखर उन्हाला चांदण्याची भूल देण्याची किमया बोरकरांची कविता जेव्हा करते तेव्हा तिने आपल्या मनाचे एका सुंदर यक्षभूमीत सहज रूपांतर करून टाकलेले असते व तेथे ऐकू येते केवळ गंधर्वगान ! त्याच सुरांनी आपण भारावून, ओथंबून गेलेले असतो.'' (रमेश तेंडूलकर, गीतभान, १९८२,पृ.७७)

सौ. जयश्री नातू
मोबाईल : ९६५७०३२५२७ ईमेल - jayashrinatu@gmail.com